# भारतातील महिला अर्थशास्त्रज्ञ : आढावा

**प्रा. डॉ. रुपाली गोवर्धन दिकोंडा** सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, जि. सोलापूर. Mobile – 9922615120, Email – dikonda.rupali2904@gmail.com

---

**गोषवारा:-**

अर्थशास्त्रातील संशोधन पत्रिका व शोधनिबंध यांचा समन्वय साधणाऱ्या रिपेक संस्थेकडे जगभरातील ५५१२३, अर्थशास्त्रज्ञांची नावे आहेत. त्यांच्या निबंध सूची ग्रंथ सूचीसह नोंदवलेली आहेत. त्यापैकी १३८६४ महिला आहेत. म्हणजे एक चतुर्थांश पेक्षा कमीच ही वस्तुस्थिती असली तरी ही यादी केवळ एका संस्थेकडील आहे आणि तीही विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञांची आहे. त्याखेरीज अर्थस्त्राच्या अनेक क्षेत्रांमध्ये महिला कार्यरत आहेत उच्च पदावर आहेत.आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख अर्थशास्त्र गीता गोपीनाथ, जागतिक बँकेच्या विद्यमान प्रमुख अर्थशास्त्रज्ञ तिनेलुपी गोल्डबर्ग आणि त्यांच्या आधी हे पद सांभाळणाऱ्या शांता देवराजन ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक्स ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट या तिसऱ्या बलाढ्य जागतिक संस्थेतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ लॉरेन्स बून.रिझर्व बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात ही काही उदाहरणे धोरणावर प्रभाव पाडू शकणारी ही पदे आहेत. जागतिक अर्थशास्त्रांची धोरणे अधिकाधिक स्त्री केंद्रीय होताना दिसत असतानाच उषा थोरात यांच्या कार्यकाळात महिलांच्या आर्थिक समावेशनाची धोरणे, अधिक व्यापक झाली हेही उल्लेखनीय आहे. ब्रिटनमधील मँचेस्टर विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका बिना अग्रवाल यांनी ग्रामीण विकासात्मक अर्थशास्त्राच्या संशोधक म्हणून स्त्रियांच्या शेतजमिनीच्या मालकीतील सहभाग या विषयाचा पाठपुरवठा केला त्यातून धोरणात्मक बदल आवश्यक असल्याचा निष्कर्ष काढला. आणि तो भारत सरकारच्या गळी उतरवला त्यातून विवाहित मुलींनाही माहेरच्या संपत्तीत हक्क देणारा बदल कायद्यात झाला. शेतीचा शोधही स्त्रियांनीच लावला असं मानलं जातं. पण प्रत्यक्षात तिचा जमिनीवर मालकी हक्क नसतो. 'अर्थशास्त्र' या शब्दाचा संस्कृतमधील वापर एका विशिष्ट काळात प्रथम झाला, तो काळ जगभरात पूर्णत: पुरुषकेंद्री होता. लिंगभाव समानतेची जाणीव गेल्या काही दशकांत विकसित होत असताना, आणि 'इकॉनॉमिक्स' याच अर्थाने आज मराठीसह अन्य भाषांत 'अर्थशास्त्र' हा शब्द रूढ झाला असताना स्त्रियांचा या क्षेत्रातील सहभाग वाढतो आहे. अर्थकारणात वावरलेल्या, तिथे आपलं योगदान दिलेल्या पाश्चात्त्य (इंग्लंड तसंच अमेरिकेमधल्या) स्त्रियांच्या कामाची दखल द विमेन हू मेड मॉडर्न इकॉनॉमिक्स या पुस्तकात घेण्यात आली आहे. पुस्तकाच्या लेखिका रॅशेल जेन रीव्ह्ज या एक ब्रिटिश राजकारणी आणि अर्थतज्ज्ञ आहेत. भावी पिढीनं फक्त पुरुषांच्या नजरेतूनच अर्थशास्त्राकडे पाहू नये, या क्षेत्रात स्त्रियांनीही योगदान दिलं आहे.

**प्रस्तावना** :-

अर्थशास्त्रातील संशोधन पत्रिका व शोधनिबंध यांचा समन्वय साधणाऱ्या रिपेक संस्थेकडे जगभरातील ५५१२३, अर्थशास्त्रज्ञांची नावे आहेत. त्यांच्या निबंध सूची ग्रंथ सूचीसह नोंदवलेली आहेत. त्यापैकी १३८६४ महिला आहेत. म्हणजे एक चतुर्थांश पेक्षा कमीच ही वस्तुस्थिती असली तरी ही यादी केवळ एका संस्थेकडील आहे आणि तीही विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञांची आहे. त्याखेरीज अर्थस्त्राच्या अनेक क्षेत्रांमध्ये महिला कार्यरत आहेत उच्च पदावर आहेत.आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख अर्थशास्त्र गीता गोपीनाथ, जागतिक बँकेच्या विद्यमान प्रमुख अर्थशास्त्रज्ञ तिनेलुपी गोल्डबर्ग आणि त्यांच्या आधी हे पद सांभाळणाऱ्या शांता देवराजन ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक्स ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट या तिसऱ्या बलाढ्य जागतिक संस्थेतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ लॉरेन्स बून.रिझर्व बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात ही काही उदाहरणे धोरणावर प्रभाव पाडू शकणारी ही पदे आहेत. जागतिक अर्थशास्त्रांची धोरणे अधिकाधिक स्त्री केंद्रीय होताना दिसत असतानाच उषा थोरात यांच्या कार्यकाळात महिलांच्या आर्थिक समावेशनाची धोरणे, अधिक व्यापक झाली हेही उल्लेखनीय आहे. ब्रिटनमधील मँचेस्टर विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका बिना अग्रवाल यांनी ग्रामीण विकासात्मक अर्थशास्त्राच्या संशोधक म्हणून स्त्रियांच्या शेतजमिनीच्या मालकीतील सहभाग या विषयाचा पाठपुरवठा केला त्यातून धोरणात्मक बदल आवश्यक असल्याचा निष्कर्ष काढला. आणि तो भारत सरकारच्या गळी उतरवला त्यातून विवाहित मुलींनाही माहेरच्या संपत्तीत हक्क देणारा बदल कायद्यात झाला.

**सूचनक शब्द** :- उच्चपदस्थ महिला,महिला अर्थशास्त्रज्ञ.

**अभ्यासाची उदिष्टे:-**

1. महिला अर्थशास्त्रज्ञ यांच्या कार्याचा आढावा घेणे.
2. अर्थव्यवस्थेमधील महिला अर्थशास्त्रज्ञ यांची भूमिका समजावून घेणे.

- गीता गोपीनाथ:-

गीत गोपीनाथ या भारतीय अर्थशास्त्रज्ञ आहेत २१ जानेवारी १९२२ रोजी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आय. एम. एफ.) च्या पहिल्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यभार स्विकारला . त्यांनी यापूर्वी २०१९ ते २०२२ दरम्यान (आय.एम.एफ) च्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून काम केले. गीता गोपीनाथ यांचा जन्म ८ डिसेंबर १९७१ रोजी झाला. गीता गोपीनाथ या हावर्ड विद्यापीठात आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्राच्या जॉन इन्वास्ट्रा प्राध्यापक आहेत. प्रोफेसर गोपीनाथ यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय वित्त आणि स्थूल अर्थशास्त्र यावर केंद्रित आहे. त्यांनी विनिमय दर व्यापार आणि गुंतवणूक आंतरराष्ट्रीय वित्तीय संकटे, चलन विषयक धोरण, कर्ज आणि उद्योगमुख बाजारपेठेतील संकटावर असंख्य संशोधन लेख लिहिले आहेत.नाणेनिधीच्या उपक्रमांचा एक भाग म्हणून त्यांनी पेंडेमिक रोग कसा संपवायचा यावर एक आंतरराष्ट्रीय योजना होती या उपक्रमाचा एक भाग म्हणून त्यांनी पेपरचे सह लेखन केले. या कार्यामुळे आय. एम. एफ. जागतिक बँक,जागतिक आरोग्य संघटना,( डब्ल्यूएचओ) आणि जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) यांच्या नेतृत्वाखाली बहुपक्षीय कार्य दलाची निर्मिती झाली ज्यामुळे साथीचा रोग संपण्यास मदत झाली आणि व्यापारातील अडथळे ओळखण्यासाठी पुरवठ्यातील अडथळे ओळखण्यासाठी त्यांनी कमी मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये कोविड-१९ लसीच्या वितरणाला गती देण्यासाठी लस उत्पादकांसह एक कार्य गट स्थापन करण्यात आला. डिसेंबर २०२१ मध्ये गोपीनाथ यांना फंडाचे नवीन प्रथम उपव्यवस्थापकीय संचलक म्हणून बढती देण्यात आली.

- राजश्री अग्रवाल:-

या अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. २००१ ते २०१० या कालावधीत त्या इलिनॉय कॉलेज ऑफ बिझनेस विद्यापीठात स्ट्रॅटेजीक मॅनेजमेंटच्या प्राध्यापिका होत्या. राजश्री अग्रवाल यांनी १९८८ मध्ये मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी आणि १९९४ मध्ये सनी बफेलो येथून अर्थशास्त्रात पीएचडी प्राप्त केली.

- ईशरजज अहलुवालिया:-

या भारतीय अर्थशास्त्रज्ञ, सार्वजनिक धोरण संशोधिका आणि प्राध्यापिका होत्या. व त्यांनी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून पदव्युत्तर पदवी आणि कोलकत्ता विद्यापीठातील प्रेसिडेन्सी कॉलेज कोलकत्ता येथून अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळवली होती. त्यांचे संशोधन भारतातील शहरी विकास, औद्योगिक विकास, स्थूल आर्थिक सुधारणा आणि सामाजिक क्षेत्र विकासाच्या मुद्द्यावर केंद्रित होते. त्या इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स रिलेशन्सच्या बोर्ड ऑफ गव्हर्नरच्या अध्यक्ष बनल्या. त्यांनी इंटरनॅशनल फुड पॉलीसी रिसर्च इन्स्टिट्यूटच्या बोर्डाच्या अध्यक्षा आणि शहरी पायाभूत सुविधांवरील भारत सरकारच्या उच्चाधिकार समितीच्या अध्यक्षा म्हणूनही काम केले. त्यांना २००९ मध्ये भारताचा पद्मभूषण हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ईश्वरजज अहलुवालिया यांच्या कार्यात सार्वजनिक धोरण, शहरी पायाभूत सुविधा, आणि शाश्वत शहरीकरण याचा समावेश आहे. ईशरजज अहलुवालिया यांनी भारतात येण्यापूर्वी वॉशिंग्टन, डीसी येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी मध्ये धोरणात्मक अर्थशास्त्रज्ञ म्हणून कारकीर्द सुरू केली. त्या इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स रिलेशन्सच्या बोर्ड ऑफ गव्हर्नरच्या अध्यक्षा बनल्या. आणि त्यापूर्वी १९८९ ते २००२ या काळात त्याच संस्थेच्या संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. भारत सरकारच्या राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मकता परिषदेच्या सदस्य होत्या. त्या आंतरराष्ट्रीय जिल्हा व्यवस्थापन संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या सदस्य होत्या.

- इंद्रजीत कौर बरठाकूर:-

या भारतीय नागरी सेविका अर्थशास्त्रज्ञान आणि लेखिका आहेत.त्यांनी भारत सरकारच्या सचिव म्हणून काम केले. आणि १९९० मध्ये भारतीय अर्थशास्त्र संघटनेच्या अध्यक्ष होत्या. इंद्रजीत कौर बरठाकूर यांना १९८९ मध्ये महिला शिरोमणी पुरस्कार, १९९२ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला पुरस्कार मिळाला. २००९ मध्ये पद्मभूषण या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित करण्यात आले.

- पद्मा देसाई:-

पद्मा देसाई यांनी ११ रशियन धोरण कर्त्यांच्या मुलाखती घेऊन भांडवलशाहीत बाजाराला काही पूर्व अटी असतात,काही नियत कार्ये असतात याचे आकलनच रशियन धोरणकर्त्यांना नसताना गोर्बाचेव आणि पेरिस्त्रोइका (खुलेपणा) हे धोरण आणले. हा निष्कर्ष त्यांनी काढला. भारताच्या पंचवार्षिक योजना आणि बोकरो स्टील सारखे मोठे सर्वजनिक उद्योग यांचाही अभ्यास त्यांनी केला व भारताप्रमाणे रशियाची आर्थिक वाटचाल १९६० ते २०२० या काळात त्या अभ्यासत होत्या. अंतिम परीक्षेत १९५९ मध्ये अर्थशास्त्र शिकण्यासाठी त्या मुंबईला आल्या. त्या अर्थशास्त्रात पहिल्या आल्या.

शिष्यवृत्तीवर त्यांनी एम.ए .केले आणि १९५७ साली हावर्ड विद्यापीठात पी.एच.डी.साठी प्रवेश मिळविला. १९६० साली पद्मा देसाई अमेरिकेत वास्तव्यासाठी गेल्या तेथे शीतयुद्धाच्या काळात रशियाचा अभ्यास करण्याची त्यांनी धमक दाखवली. रशियाच्या 'अधिकृत' आकडेवारीचा ताळमेळ अन्य घटकांशी बसवणे ही पद्धती त्यांनी विकसित केली. वर्कलेच्या 'युक्ला' आता पुढे कोलंबिया विद्यापीठात शिकवत असतानाच जवळच्या रशिया अभ्यास केंद्राचे काम त्यांनी १९८५ पर्यंत केले.

- उत्सा पटनायक :-

उत्सा पटनायक एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी कृषी अध्यापन, राजनीतिक अर्थव्यवस्था, आर्थिक विचारांचा इतिहास आणि साम्राज्यवाद या क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, त्यांनी कृषी संबंध किसान आंदोलन, खाद्य सुरक्षा, गरिबी हटाव, राजकोषीयनीती,व्यापार नीती,ऋण संकट,वैश्विकरण,नवउदारवाद,पुंजीवाद,समाजवादमार्क्सवाद-लेनिनवाद यासारख्या यासारख्या विभिन्न विषयावर पुस्तकांचे लेखन केले आहे.

- निर्मला सीतारामन:- निर्मला सीतारामन यांचा जन्म १८ ऑगस्ट १९५९ रोजी तामिळनाडूतील मदुराई येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण मद्रास आणि तिरुचिरापल्ली येथे झाले. तिरुचिरापल्ली येथील सीतालक्ष्मी रामास्वामी महाविद्यालयातून अर्थशास्त्रात कला शाखेची पदवी व अर्थशास्त्रात मास्टर ऑफ आर्ट्स पदवी आणि एम.फिल.त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली येथून १९८४ मध्ये पूर्ण केले. सितारामन २००६ मध्ये भाजपमध्ये सामील झाल्या आणि २०१० मध्ये त्यांना पक्षाच्या प्रवक्त्या म्हणून नियुक्त करण्यात आले. २०१४ मध्ये त्यांना नरेंद्र मोदीच्या मंत्रिमंडळात कनिष्ठ मंत्री म्हणून समाविष्ट करण्यात आले. आणि जून २०१४ मध्ये त्यांची आंध्र प्रदेश मधून राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाली. ११ जून २०१६ रोजी सीतारमण यांनी राज्यसभेची निवडणुक कर्नाटक मधून यशस्वीपणे लढवली. त्यांनी भारताच्या संरक्षण मंत्री म्हणून काम केले. आणि २०१९ मध्ये भारतीय हवाई दलाने केलेल्या बालाकोट हवाई हल्ल्याचे नेतृत्व त्यांनी केले आहे. त्या सध्या भारताचे वित्त आणि कार्पोरेट व्यवहार मंत्री म्हणून काम करत आहेत. आणि त्यांनी भारताचे चार वार्षिक बजेट सादर केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने $३.१ ट्रिलियन अर्थव्यवस्थेचा टप्पा गाठला. सितारामन यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री म्हणून नवी दिल्ली येथे ७ सप्टेंबर २०१७ रोजी पदभार स्वीकारला.सितारामन जानेवारी २०१८ मध्ये भारताच्या नौदल पराक्रमाच्या प्रदर्शनाच्या अध्यक्षते खाली ३ सप्टेंबर २०१७ रोजी त्यांची संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या इंदिरा गांधी नंतर या पदावर असलेल्या दुसऱ्या महिला होत्या परंतु पूर्ण वेळ महिला संरक्षण मंत्री होत्या. सितारामन यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय अर्थ कार्पोरेट व्यवहार मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. ३१ मे २०१९ रोजी निर्मला सीतारामन यांची अर्थ आणि कार्पोरेट व्यवहार मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या भारताच्या पहिल्या पूर्णवेळ महिला अर्थमंत्री आहेत. त्यांनी ५ जुलै २०१९ रोजी भारतीय संसदेचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. सितारामन यांनी १फेब्रुवारी २०२० रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ सादर केला भारतातील कोविड-१९ महामारी दरम्यान त्यांना कोविड-१९ इकॉनॉमिक्स रिस्पॉन्स टास्क फोर्सचे प्रभारी बनवण्यात आले.

- उषा थोरात:-

उषा थोरात यांचा जन्म चेन्नई येथे झाला. रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर या पदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.उदारीकरण धोरण स्वीकारल्यानंतर देशात बँकिंग क्षेत्रातही बदलाचे वारू वाहू लागले बँकिंग सुधारणांच्या काळात अगदी गावपातळीवरील शेतकरी आणि सामान्य नागरिकाला बँकिंग प्रणालीमध्ये सहभागी करून घेण्याचे एक मोठे आव्हान त्या काळात उभे होते. त्याचबरोबर देशात मोठ्या प्रमाणावर असलेल्या ग्रामीण भागात बँकिंग सेवा पोचवण्याची गरज होती. अशा आव्हानात्मक परिस्थितीत उषा थोरात यांच्यावर रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पदाची जबाबदारी आली आणि ती त्यांनी अतिशय कौशल्याने पार पडली. रिझर्व बँकेतील करन्सी मॅनेजमेंट या जोखमीच्या विभागाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली या विभागाबरोबर ठेवीसाठीचा विमा ग्रामीण भागातील नियोजन आणि गावपातळीपर्यंत पोहोचवणाऱ्या अर्बन बँक विभागाच्या कामकाजाला त्यांनी नवी ऊर्जा दिली. पश्चिम महाराष्ट्रात सहकाराचे मोठे जाळे आहे. त्या माध्यमातून गाव पातळीवर कार्य करत असलेल्या सेवा संस्था दूध संस्थांचा कार्यभार योग्य पद्धतीने चालत असला तरी त्या सर्व घटकांना बँकिंगशी जोडण्याचा दृष्टीने थोरात यांनी प्रयत्न केले. ग्रामीण भागात बँकिंग साक्षरता वाढविण्याचा आग्रह होता म्हणूनच त्यांनी बँकेच्या सेवा तेथील शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचविण्यासाठी बँक करस्पॉन्डट (बीसी) उपक्रमाला चालना देणे. त्यामागे ग्रामीण विकासाबरोबर शेतकरी विशेषता: महिला सक्षमीकरण हा उदात्त हेतू होता.

तो बँकिंग मधील व्यापक धोरणामुळे साध्य झाला. अजूनही महिलांच्या हातात घरातील बँकेचा कारभार सोपवण्यापासून हातअकडता घेण्याची मानसिकता आहे.

**समारोप:-**

शेतीचा शोधही स्त्रियांनीच लावला असं मानलं जातं. पण प्रत्यक्षात तिचा जमिनीवर मालकी हक्क नसतो. 'अर्थशास्त्र' या शब्दाचा संस्कृतमधील वापर एका विशिष्ट काळात प्रथम झाला, तो काळ जगभरात पूर्णत: पुरुषकेंद्री होता. लिंगभाव समानतेची जाणीव गेल्या काही दशकांत विकसित होत असताना, आणि 'इकॉनॉमिक्स' याच अर्थाने आज मराठीसह अन्य भाषांत 'अर्थशास्त्र' हा शब्द रूढ झाला असताना स्त्रियांचा या क्षेत्रातील सहभाग वाढतो आहे. अर्थकारणात वावरलेल्या, तिथे आपलं योगदान दिलेल्या पाश्चात्त्य (इंग्लंड तसंच अमेरिकेमधल्या) स्त्रियांच्या कामाची दखल द विमेन हू मेड मॉडर्न इकॉनॉमिक्स या पुस्तकात घेण्यात आली आहे. पुस्तकाच्या लेखिका रॅशेल जेन रीव्ह्ज या एक ब्रिटिश राजकारणी आणि अर्थतज्ज्ञ आहेत. भावी पिढीनं फक्त पुरुषांच्या नजरेतूनच अर्थशास्त्राकडे पाहू नये, या क्षेत्रात स्त्रियांनीही योगदान दिलं आहे.

**संदर्भ:-**

1. Agarwal, Bina (1986). Mechanization in Indian agriculture: an analytical study based on the Punjab. New Delhi u.a: Allied Publishing. ISBN 9788170230793.
2. "Rajshree Agarwal | Maryland Smith". www.rhsmith.umd.edu. Retrieved 5 October 2021.
3. Ahluwalia, Isher (1989). Industrial growth in India: stagnation since the mid-sixties. New Delhi: Oxford University Press. ISBN 9780195624779.
4. Inderjit Kaur Barthakur". Kumud Books. 2015. Archived from the original on 4 March 2016. Retrieved 17 October 2015.
5. "Nirmala Sitharaman appointed Finance Minister in Modi govt 2.0 as Arun Jaitley retreats". The Financial Express. 31 May 2019. Archived from the original on 1 June 2019. Retrieved 1 June 2019.
6. https://en.wikipedia.org/wiki/Women_in_economics.
7. https://ideas.repec.org/top/top.women.html.
8. https://www.ubs.com/global/en/our-firm/women-in-economics/meet-the-economists.html.
9. Roy, Anup (9 August 2019). "RBI's Usha Thorat panel for easier foreign play in currency market". Business Standard India. Retrieved 16 May 2021.

10)"RBI to maintain ample liquidity: Thorat". The Hindu. Chennai, India. 26 June 2009.

11) "Gita Gopinath's journey from Mysuru to becoming America's 'Great Immigrant'". The Times of India. ISSN 0971-8257. Retrieved 20 June 2024.

12) महिला आणि अर्थशास्त्र - Marathi News | Editorial about Women and Economics | Latest Editorial _News _at Lokmat.com.

13) बुकमार्क : ...हाती अर्थशास्त्राची दोरी! | bookmark book review the women who made modern economics by author rachel reeves zws 70.

14) The 'Smart Economics' of Moving Women from the Private to the Public Sphere.

15) https://www.worldbank.org/en/news/speech/2018/03/17/women-indias-economic-growth.

16)https://www.researchgate.net/publication/335557481_A_Study_on_Role_of_Women_in_Economic_Development_in_India.

17) https://pmc.ncbi.nlm.nih.gov/articles/PMC10111325/